दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १५३ वा गुरूवार दि.२८ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# शिवसेना शिंदे गटाच्या खासदारांनी घेतली अमित शाह यांची भेट

नवी दिल्ली : शिवसेना शिंदे गटाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. राज्यात महायुतीला मोठा विजय मिळाल्यानंतरही मुख्यमंत्री कोण होणार, याबद्दल निर्णय झालेला नाही. या पार्श्वभूमीवर ही भेट झाली. दरम्यान, बुधवारीच दुपारी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनीही अमित शाह यांची भेट घेतली.

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीला मोठा विजय मिळाला. या विजयानंतर चार दिवस उलटूनही महायुतीने मुख्यमंत्री कोण असेल, हे जाहीर केले नाही. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनी अमित शाह यांची भेट घेतली. ही भेट सदिच्छा भेट असल्याचे सुनील तटकरे यांनी सांगितले. निवडणूक झाल्यानंतर ही पहिलीच भेट होती, त्यामुळे या भेटीला महत्त्व प्राप्त झाले. पटेल, तटकरे यांची भेट झाल्याच्या



काही काळानंतर शिवसेना शिंदे गटाच्या खासदारांचे शिष्टमंडळही अमित शाह यांच्या भेटीला गेले. एकनाथ शिंदे यांची मुंबईत पत्रकार परिषद सुरू असतानाच दिल्लीत ही भेट झाली. शिंदे गटाच्या खासदारांनीही ही भेट केवळ सदिच्छा भेट असल्याचे सांगितले.

शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांना वाटते की, एकनाथ शिंदे यांनाच पुन्हा मुख्यमंत्री बनवावे. काही नेत्यांनी तसे बोलूनही दाखवले. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावरून या भेटीत चर्चा झाल्याचे समजते. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः स्पष्ट केले की ते उद्या देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह दिल्लीत येणार आहेत आणि अमित शाह यांच्याशी भेटून चर्चा करणार आहेत. त्यामुळे या भेटीत फार काही घडू शकले नाही.

शिंदे गटाच्या शिष्टमंडळात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, खासदार श्रीरंग बारणे, धैर्यशील माने, मिलिंद देवरा, संदीपान भुमरे, रविंद्र वायकर, माजी खासदार राहुल शेवाळे उपस्थित होते.

## अखेर मुख्यमंत्री ठरला! पंतप्रधान मोदींची फडणवीसांच्या नावाला पसंती

अखेर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. मुख्यमंत्री पदासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला पसंती दिल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी पुढारी न्यूजला दिली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासोबतच पंतप्रधानांचीही फडणवीस यांच्या नावाला पसंती असून शुक्रवारी अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. राज्याच्या मुख्यमंत्रिपदी कोणाची नियुक्ती होईल, याबाबतचा पेच निकालानंतर चौथ्या दिवशीही कायम असून, याबाबत भाजप हायकमांडने काहीही निर्णय अद्याप घेतला नसल्याचे कळते. एकनाथ शिंदे हे आता राजीनाम्यानंतर काळजीवाहू मुख्यमंत्री झाले आहेत.



# विधानसभेत मुस्लिमांचा कौल कुणाला?

मुंबई : प्रतिनिधी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीला बहुमत मिळाले. यात मुस्लिम समाजाने लोकसभेला महाविकास आघाडीच्या बाजूने मतदान केल्याचे सांगितले जाते, आकडेवारी मांडली जात आहे. आता विधानसभा निवडणुकीला मुस्लिम समाजाचे मतदान नेमके कोणाच्या बाजूने याची आकडेवारी समोर आली आहे.

दरम्यान,भाजप महायुतीला २३७ जागा मिळाल्या. महायुती देखील एवढ्या मोठ्या यशाने भारावून गेली आहे. त्यामुळे कोणत्या समाजाने कोणाच्या पारड्यात किती मते टाकली, याची आकडेवारी मांडली जात आहे. राज्यातील ३८ विधानसभा मतदारसंघांत मुस्लिम लोकसंख्या २० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या मतदारसंघांपैकी २२ ठिकाणी महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. महाविकास आघाडीला अवघ्या १३ जागांवर विजय मिळाला आहे. तर अन्य तीन जागांवर इतर उमेदवारांनी विजय मिळवला आहे.



मुस्लिम मतदारांच्या मतांत यंदाच्या निवडणुकीत फाटाफूट झाल्याचे दिसते. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसरे ११ जागा जिंकल्या होत्या. यावेळी पाचच जागा जिंकल्या. शिवसेना उबाठाला सहा, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला दोन जागा मिळाल्या आहेत.

राज्यात सर्वाधिक जागा भाजपने जिंकल्या आहेत. मुस्लिम लोकसंख्या जास्त असलेल्या ३८ मतदारसंघांत भाजपने आपल्या कामगिरीत चांगलीच सुधारणा केली आहे. गेल्या निवडणुकीत ११ जागा जिंकणाऱ्या भाजपने यंदा १४ जागा जिंकल्या आहेत.

शिंदे यांच्या शिवसेना पक्षाने सहा, तर अजित पवार यांनी दोन जागा जिंकल्या आहेत. समाजवादी पक्षाने दोन, तर एमआयएमने एक जागा जिंकली आहे. झिशान सिद्दिकी, नवाब मलिक आणि नसीम खान हे दिग्गज मुस्लिम नेते या निवडणुकीत पराभूत झाले आहेत.

जलील यांचा पराभव मतविभागणीमुळे एकापेक्षा जास्त मुस्लिम उमेदवार असल्याचा फटका महाविकास आघाडीला बसला आहे. यातून महायुतीचा विजय सोपा झाला. छत्रपती संभाजीनगर पूर्व मतदारसंघात एमआयएमचे इम्तियाज जलील यांचा पराभव मतविभागणीमुळे झाला. वंचितचे अफसर खान आणि समाजवादी पक्षाचे अब्दुल गफार सय्यद या मुस्लिम उमेदवारांनी इम्तियाज जलील यांच्या पराभवात निर्णायक भूमिका बजावली.

## महामार्गांमुळे विकासाला चालना मिळेल! खा.बजरंग सोनवणेंनी घेतली नितीन गडकरींची भेट

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी राष्ट्रीय महामार्गांचे जाळे निर्माण होणे नितांत गरजेचे आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना मंजुरी देवून बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांचा केंद्राकडे पाठपुरावा सुरु आहे. त्या अनुषंगाने खा.सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे. बीड जिल्ह्याचा म्हणावा तेवढा विकास झालेला नाही. त्यामुळे बीडच्या भोवताली राष्ट्रीय महामार्गांचे जाळे तयार झाल्यास शेतकरी, उद्योगधंदे, व्यवसायीक, नागरिकांना दळणवळण सोपे होवून त्यांच्या विकासात आणखीन भर पडेल. यासह महत्त्वपूर्ण मागण्या संदर्भात खा. बजरंग सोनवणेंची मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत चर्चा झाली. यावेळी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग ५० हा,उमापुर फाटा-धोंडराई-उमापुर - बोधेगाव-शेवगाव ते नेवासा हा रस्ता राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट करण्यात यावा. तसेच राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी व ५४८ सी वरील प्रमुख शहरांच्या भोवती नवीन बाह्य वळण



रस्ता मंजूर करण्यात यावा. बीड शहरासाठी राष्ट्रीय महामार्ग-५२ च्या जंक्शनपासून पालवण, तळेगाव, वासनवाडी, रामनगरपर्यंतचा बायपास रस्ता मंजूर करण्यात यावा. राष्ट्रीय महामार्ग १६ पिट्ठी पिंपळगाव धस - गारमाथा - डोंगरकिन्ही - अंमळनेर - धामनगांव-टाकळी काझीपर्यंतचा रस्ता राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट करण्यात यावा. बीड शहरालगतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या वळण रस्त्यालगत सर्व्हिस रोड आणि व्हीयुपी कामास मंजुरी देण्यात यावी. सदरी कामे मंजूर झाल्यास बीड जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळेल.त्यामुळे नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होती.अशी मागणी निवेदनातून केली. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मागण्या संदर्भात सकारात्मक चर्चा करून, येत्या काळात बीड जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी निधी मंजूर केला जाईल. असा शब्द केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी खा. बजरंग सोनवणे यांना दिला. त्यामुळे आगामी काळात बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग आणि इतर विकासाची कामे निश्चितच जलद गतीने मार्गी लागणार आहेत. सदरील विकास कामासंदर्भात आपण केंद्राकडे सतत पाठपुरावा करत राहणार आहोत. अशी माहिती खा. बजरंग सोनवणे यांनी प्रसार माध्यमातून दिली.

## आरवली-माखजन रस्त्याच्या दुरुस्तीची नागरिकांची मागणी बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे वाढली जिवितहानीची शक्यता





आरवली-माखजन-करजुवे मुख्य रस्त्याला कोणी वालीच नाही कारण लोकप्रतिनिधी फक्त मतांसाठी वाडी वस्त्यावरील रस्त्यांना प्राधान्य देतात आणि मुख्य रस्त्याकडे ना लोकप्रतिनिधींचे लक्ष ना सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष. याकडे वेळीच लक्ष न दिल्यास जर कोणतीही जिवितहानी झाल्यास याला लोकप्रतिनिधी व बांधकाम विभाग जबाबदार राहील - बाबु मोरे,शिवसेनाप्रमुख सामाजिक कार्यकर्ते.

माखजन/ प्रतिनीधी : आरवली-माखजन-करजुवे या मुख्य रस्त्यावर एप्रिल ते मे महिन्यात अर्धवट काम करून ठेवले गेले आहे. या अशा अर्धवट कामामुळे पावसाळ्यामध्ये सरंद या गावात बाईक स्वाराचे, रिक्षावाल्याचे अपघात झाले आहेत. तरी बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

पावसाळा संपून दोन महिने झाले आहेत. वेळीच आरवली-माखजन-करजुवे या मुख्य रस्त्याची दुरूस्ती न केल्यास आता थंडीच्या दिवसात पहाटे व रात्री धुक्यामुळे या रस्त्यावर आणखी अपघात होण्याची दाट शक्यता आहे. रस्ता अर्धवट केल्याने एक बाजु चांगली तर दुसरी बाजु खोलगट अशी अवस्था झाली आहे. जो-तो वाहन चालक चांगल्या रस्त्याने वाहन घेवून जाण्याचाच प्रयत्न करतो आणि एकमेकाना साईड देताना एक ते दोन फुट खाली कोसळतो आहे. असे अपघात गेले ६ महिन्यांत बरेच झाले आहेत. रात्रीच्या वेळी अशा अपघातात वाढ होऊन जिवितहानी होण्याची शक्यता आहे. म्हणून बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्याची दुरूस्ती करावी अशी येथील रस्त्यालगत राहणार्या रहिवाशांची मागणी आहे.

## महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित आमदार व जिल्हाध्यक्षांच्या बैठकीस माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख राहीले उपस्थित प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांनी त्यांचे केले स्वागत


लातूर / प्रतिनीधी : - काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत टिळक भवन मुंबई येथे झालेल्या नवनिर्वाचित आमदार व जिल्हाध्यक्षांच्या बैठकीस राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख उपस्थित राहीले. विधानसभा निवडणूक निकाला नंतर पक्षाची पुढील रणनीती ठरवण्यासाठीच्या चर्चेत सहभाग घेतला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांनी त्यांचे स्वागत केले. महाराष्ट्र प्रांताध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित विधानसभा सदस्य व नांदेड लोकसभेचे नवनिर्वाचित सदस्य तसेच नवनिर्वाचित सदस्यांचे संबंधित जिल्हाध्यक्ष यांची बैठक बुधवार, दि. २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी १.०० वा. टिळक भवन, दादर, मुंबई येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीस राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख उपस्थिती राहीले, काँग्रेस पक्षाची विधानसभा निवडणूक निकालानंतरची पुढील रणनीती ठरवण्यासाठीच्या चर्चेत सहभाग घेतला. विधानसभा निवडणूकीत काँग्रेस महाविकास आघाडीला झालेले मतदान, या अनुषंगाने पूढील काळातील नियोजन बाबत चर्चा झाली. या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांनी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचे स्वागत केले.



# ठाकरे शिवसेना महापालिका निवडणुका स्वबळावर लढविणार?

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा सुपडासाफ झाला. अवघ्या ४६ जागा मिळाल्या. शिवसेना ठाकरे गटाला सर्वाधिक २० जागा मिळाल्या. या निकालावर आता संमिश्र प्रतिक्रिया उमटू लागल्या असून शिवसेना आमदारांतून नाराजीचा सूर निघू लागला आहे. मातोश्रीवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आमदारांनी याबाबत तक्रारी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादीची मते शिवसेनेच्या मशालीकडे वळली नाहीत, अशा तक्रारी आमदारांनी ठाकरे यांच्याकडे केल्या. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या उमेदवारांना सहकार्य केले नाही, असे त्यांनी यावेळी सांगून आमदारांनी नाराजी व्यक्त केली. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या आणि महापालिकांच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्यात अशी मागणी यावेळी आमदारांनी केल्या. त्यामुळे ठाकरे शिवसेना महापालिका स्वबळावर लढणार का ? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. विधानसभा निवडणुका वेगळ्या असतात. महानगरपालिका निवडणुका वेगळ्या असतात.



## संपादकीय....

### पाकिस्तानातील अस्वस्थता

पाकिस्तानच्या पंजाब, सिंध अथवा बलुचिस्तान प्रांतामध्ये सातत्याने दहशतवादी हल्ले, बॉम्बफेक, गोळीबार अशा घटना घडतच असतात. गेल्याच आठवड्यात खैबर पख्तुनख्वाँमधील कुर्रम भागात दहशतवाद्यांनी प्रवासी व्हॅनवर अंदाधुंद गोळीबार करून २५ जणांना ठार मारले. त्याआधी ९ नोव्हेंबरला बलुचिस्तान प्रांतातील रेल्वेस्थानकावर करण्यात आलेल्या आत्मघातकी बॉम्बस्फोटात २७ जणांचा मृत्यू झाला. 'बलुच लिबरेशन आर्मी' या दहशतवादी संघटनेने या घटनेची जबाबदारी स्वीकारली होती. मुळात भाववाढीमुळे पाकिस्तानातील जनता हैराण आहे. लोकांना जगणे कठीण झाले आहे. परकीय चलनाच्या कमतरतेमुळे आयात महाग झाली आहे. अशी ही सर्व प्रतिकूल स्थिती असतानाच तुरुंगात असलेले माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या सुटकेसाठी त्यांचे समर्थक पुन्हा एकदा रस्त्यावर उतरले आहेत. त्यांच्याकडून निदर्शने केली जात आहेत. तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) या त्यांच्या पक्षाच्या आवाहनानंतर देशभरातून समर्थकांचे तांडेच्या तांडे शक्तिप्रदर्शन करत राजधानी इस्लामाबादच्या दिशेने कूच करत आहेत. सरकारकडून मात्र त्या कार्यकर्त्यांना अटक केली जात असून, अश्रुधूर आणि बळाचा वापरही केला जात आहे. पहिल्या दिवशी या जमावाला इस्लामाबादमध्ये जाण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी मागे रेटण्याचा प्रयत्न केला, तेव्हा झालेल्या धुमश्चक्रीत एका पोलिसाचा मृत्यू झाला आणि ७० जण जखमी झाले. अनेक पोलिसांनाच समर्थकांनी ओलीस ठेवले असून, जे जखमी झाले. त्यातील बहुसंख्य पोलिसच आहेत.

इम्रान यांच्या पत्नी बुशराबीबी या जमावास भडकवत असल्याचा आरोप पंजाबच्या माहितीमंत्री उझमा बुखारी यांनी केला आहे. उलट पोलिसांनी पंजाब तसेच इस्लामाबादमध्ये या पक्षाचे ३,५०० नेते व कार्यकर्त्यांना अटक केली असल्याचे सांगण्यात येत आहे. अशातच आंदोलनाच्या दिवशी चेंगराचेंगरीत चार जवानांचा आणि दोन पोलिसांचा मृत्यू झाला, तर १०० हून अधिक पोलिस जखमी झाले. जमावाला पांगवताना पोलिसांनी जवळ कोणतेही शस्त्र बाळगू नये, अशा सूचना पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाझ यांनी दिल्या होत्या; पण 'पीटीआय'ने खैबरपख्तुनख्वाँ येथूनच शस्त्रे आणली होती आणि या पक्षाचे कार्यकर्ते जाणीवपूर्वक हिंसाचार भडकवत असल्याचा आरोप उझमा यांनी केला आहे. इस्लामाबादमध्ये पाकिस्तानच्या पंतप्रधानांसह अनेक मंत्र्यांची निवासस्थाने आणि महत्त्वाच्या सरकारी इमारतीही आहेत. त्यापासून जवळच भर चौकात निदर्शकांना बसण्याची परवानगी दिल्यास कोणताही गंभीर प्रसंग उद्भवू शकतो, अशी भीती सरकारला वाटत असणार. विशेष म्हणजे, या मोर्चाचे नेतृत्व बुशराबीबी यांच्यासह खैबरपख्तुनख्वाँचे मुख्यमंत्री अली अमीन गांदापूर करत आहेत. पाकिस्तानातील राजकारणावर लष्कराची पूर्ण पकड असून, लष्कराला इम्रान यांना मोकळे सोडणे धोक्याचे वाटत आहे. काही महिन्यांपूर्वीच तेथे सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. त्यापूर्वीच पंतप्रधान असताना इम्रान यांच्यावर मिळालेल्या महागड्या सरकारी भेटवस्तू स्वतःकडे ठेवल्या व नंतर विकल्याचा आरोप झाला होता.

२०१८ मध्ये इम्रान पंतप्रधानपदी असताना, त्यांच्यावर तोशखाना प्रकरणावरून विरोधकांनी टीका केली होती. इम्रान आणि त्यांच्या पत्नी बुशराबीबी यांना शिक्षा झाली. एवढेच नाही, तर पाच महिन्यांपूर्वी सत्ताधारी शाहबाझ शरीफ सरकारने 'पीटीआय' पक्षावर बंदीच घालण्याचा निर्णय घेतला. हा पक्ष अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा सरकारने केला. पक्षाला दुबईस्थित अबराज समूहाचे संस्थापक आरिफ नकवी आणि अबुधाबीच्या राजघराण्याचे सदस्य शेख नाह्यान बिन मुबारक अल-नाह्यान यांच्याकडून निधी मिळाल्याची माहिती उघड झाली आहे. याचा अर्थ, इम्रान यांच्याप्रमाणेच त्यांचा पक्षही घोटाळेबाजच असल्याचा आरोप या कारणावरून होत आहे. आपल्याला सत्तेवरून खाली खेचण्यात अमेरिकेचा हात आहे, असा जाहीर आरोप इम्रान यांनी केला होता. २०२२च्या सुरुवातीला पाकिस्तानात 'सायफर' हे प्रकरण घडले. कोड लँग्वेजचा वापर करून लिहिण्याची गोपनीय पद्धत म्हणजे 'सायफर'. यामध्ये कथितपणे अमेरिकेकडून धमकावणारा संदेश पाठवण्यात आला होता आणि इम्रान पंतप्रधानपदावरून हटवण्यात अमेरिकेचा हात असल्याचाच हा पुरावा असल्याचे सांगण्यात आले होते. हा 'सायफर' अमेरिकन अधिकारी आणि पाकिस्तानी राजदूत यांच्यात ७ मार्च २०२२ रोजी झालेल्या कथित बैठकीविषयीचा होता. इम्रान यांनी रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाबाबत घेतलेल्या तटस्थ भूमिकेवर अमेरिकेने नाराजी व्यक्त केल्याचा उल्लेख त्यात होता. हा गुप्त संदेश इम्रान यांनी प्रसारित केल्यानंतर पाकच्या फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने त्यांच्याविरुद्ध गुप्ततेचा भंग केल्याचा गुन्हा नोंदवला.

यावर्षीच्या जानेवारीमध्ये इम्रान यांना 'सायफर' प्रकरणात दहा वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली; पण ३ जून रोजी अपील न्यायालयाने हा निकाल रद्दबातल ठरवत त्यांची निर्दोष मुक्तता केली. खरे तर, एप्रिल २०२२ मध्ये इम्रान यांची पंतपधानपदावरून गच्छंती झाल्यानंतर त्यांच्या विरोधात डझनभर खटले दाखल करण्यात आले आहेत. गेल्यावर्षीच्या मे महिन्यात भ्रष्टाचारप्रकरणी त्यांना अटक झाल्यानंतर पाकिस्तानात हिंसाचार सुरू झाला. एवढेच नव्हे, तर लाहोरमधील सर्वोच्च लष्करी कमांडरचे निवासस्थान आणि रावळपिंडी येथील पाक लष्कराचे मुख्यालय यावरही 'पीटीआय' समर्थकांनी हल्ला केला. यंदाच्या फेब्रुवारीत झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत गैरव्यहार झाल्याचा आरोप इम्रान यांनी केला होता. या निवडणुकीत 'पीटीआय'चा पाठिंबा लाभलेल्या नव्वदहून अधिक अपक्ष उमेदवारांनी नॅशनल असेम्ब्लीत सर्वाधिक जागा जिंकल्या होत्या. त्यापेक्षा खूप कमी जागा ज्यांनी जिंकल्या, त्या पाकिस्तान मुस्लिम लीग नवाझ आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी यांनी मिळून आघाडी सरकार स्थापन केले. जनादेश चोरून हे सरकार स्थापन झाल्याचा इम्रान यांचा आरोप होता. आज इम्रान यांचा पक्ष सर्वाधिक लोकप्रिय असला, तरीही लष्करास त्यांचे नेतृत्व मान्य नाही.

# यशाचे 'डिझाइन' राष्ट्रवादीचेच!

नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजप शिंदेंची शिवसेना व अजितदादांच्या राष्ट्रवादीला घवघवीत यश मिळाले. लोकसभेत महायुतीला फटका बसल्यानंतर अत्यंत सावध व सतर्क राहून महायुती या निवडणुकीला सामोरी गेली. सरकारने राबविलेली लाडकी बहीण योजना या यशात 'गेमचेंजर' ठरली. जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महाराष्ट्र अक्षरशः पिंजून काढला. दादांना पक्षातील नेत्यांसह तळागाळातील सामान्य कार्यकर्त्यांची साथ मिळाली व महायुतीच्या यशात ५५ पैकी ४१ जागा जिंकून दादांनी आपले 'सर्व क्षेत्राधिपती' हे बिरुद सिद्ध केले. उमेदवार निवडीपासून काळजी घेतली. दिवस-रात्र एक केला व स्वतःच्या प्रकृतीकडे प्रसंगी दुर्लक्ष करून विजयश्री खेचून आणली.

बारामतीकरांनी विकासालाच प्राधान्य देत दादांना भरभरून आशीर्वाद दिले आहेत. अनेक जिल्ह्यांत घड्याळ चिन्हाचा उमेदवार नसताना महिला मतदार भगिनींनी 'आम्हाला १५०० रु. महिला ओवाळणी देणाऱ्या भावाला मतदान करायचं' म्हणून घड्याळ समजून कमळ व धनुष्यबाणालाही मतदान केले; हे चित्र मी स्वतः माझ्या अकोला जिल्ह्यात बघितले.

दर दिवसाला पाच ते दहा सभा, उमेदवारांच्या बैठका, विरोधकांची समजूत काढून त्यांचे बंड शमविणे, बूथप्रमुखांच्या भेटीगाठी, पत्रकारांना मुलाखती अक्षरशः विशीतील तरुणालाही लाजवेल अशी अफाट मेहनत दादा घेताना दिसले. दादांच्या प्रत्येक भाषणात उज्ज्वल महाराष्ट्राचे स्वप्न दडलेले होते. महिला सबलीकरण, शिव- शाहू- फुले- आंबेडकरवाद, बटेंगे तो कटेंगेचा स्पष्ट विरोध, तरुणांना रोजगार, शेतकऱ्यांची वीज बिल माफी, उपसा सिंचन योजना, मतदारसंघाचा विकास आराखडा व सर्वधर्मसमभाव हा दादांच्या भाषणाचा गाभा असायचा.

बोले तैसा चाले याची प्रचीतीही तिकीटवाटपातून दिसून आली. महाराष्ट्रात जेवढे पक्ष निवडणूक रिंगणात होते त्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असा एकमेव पक्ष ठरला ज्यात दादांनी १० टक्के महिला उमेदवार, १० टक्के मुस्लीम उमेदवार, १२ टक्के अनुसूचित जातींचे उमेदवार, १४ टक्के अनुसूचित जमातींचे उमेदवार; तर उरलेले ५४ टक्के ओबीसी मराठा उमेदवार दिले.

दादांचे कष्ट, काम करण्याची पद्धत, आखलेली रणनीती व तळागाळापर्यंत पोहोचविलेल्या योजना या सर्व गुणसंवर्धनामुळे दादांनी ४१ जागा जिंकून, शिंदेंच्या सेनेपेक्षा वरचा स्ट्राइकरेट मिळवून प्रादेशिक पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राज्यात एक नंबर बनविले. दादांच्या झंजावाताने तुतारीची अवस्था गाजराच्या पुंगीसारखी केली. विरोधकांचे अक्षरशः वाभाडे निघाले. या निकालातून 'राष्ट्रवादी' तावूनसुलाखून निघाली. कार्यकर्त्यांची मोलाची साथ व सहकाऱ्यांचे कष्ट सार्थकी लागले आणि या यशाचे मानकरी 'डिझाइन बॉक्स'वाले अरोरा बनले. त्यांनी चक्क पक्ष नेतृत्वाच्या खांद्यावर हात टाकून 'सॅलरी टीम'ला यशाचे श्रेय बहाल केले. चंडीगडहून राष्ट्रवादीत घुसलेला हा गुलाबी रंग दादांच्या पुण्याईने नावारूपास आला.

मात्र यशाला अनेक जनक असतात अपयश हे पोरके असते. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदेंकडे अनेक 'पी. आर. एजन्सी' आहेत. त्यांनी कधीच यशाचे श्रेय घेतले नाही, उलट भाजप वा शिवसेनेच्या एजन्सीचे नाव मला किंवा कोणालाच माहिती नाही. शिंदे/फडणवीसांच्या खांद्यावर हात ठेवायची कुणाची हिंमत नाही. इथे मात्र 'डिझाइन बॉक्स'वालेच पक्षाचा मालक बनतो की काय असे वाटू लागले. अजितदादांच्या अखंड मेहनतीने कमावलेले हे यश व त्या यशाचे 'डिझाइन' केवळ राष्ट्रवादीचे आहे. पडद्याआड राहून, घरच्या भाकरीवर सोशल मीडियाद्वारे काम करत राहणारा पक्षातील सामान्य कार्यकर्ता बहिर्जी नाईकांप्रमाणे निष्ठेने आजही काम करतो, म्हणूनच तो दादांचा खरा 'सोल्जर' ठरतो.

नुकतेच शिवसेना नेते रामदासभाई कदम यांनी 'राष्ट्रवादीने आमची बार्गेनिंग पॉवर कमी केली' असे विधान करून, कारण नसताना महायुतीत मिठाचा खडा टाकला. तसे पाहता या निवडणुकीत 'लढवलेल्या व जिंकलेल्या जागा' या निकषावर राष्ट्रवादी सरस भरली. विरोधी पक्षनेता सभागृहात नसण्याची वेळ विधिमंडळावर आली. महायुतीच्या त्सुनामीत भलेभले संपून गेले. बारामतीच्या राजकारणातही अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. आशाकाकींना प्रचारात उतरवले गेले, शर्मिलावहिनी पवार यांनी तर बूथप्रमुख ते बूथ एजंट यांच्यावर गुंडगिरीचा आरोप केला. रोहित पवार हे दादांच्या बदनामीत सदैव अग्रेसर दिसले. या साऱ्याला जितेंद्र आव्हाड यांची अश्लाघ्य टीका, गुलाबी जॅकेटबद्दल वारंवार खालच्या पातळीवर टीका करणारे खासदार कोल्हे यांची साथ मिळाली. एकीकडे टीकाकारांची झुंड, पवारसाहेबांच्या स्टेजवरून आगपाखड करणारे हौशे, गवशे, नवशे असताना राष्ट्रवादीची 'सोशल मीडिया टीम' तितक्याच ताकदीने प्रतिकार करत होती. सुदर्शन जगदाळेसारखा दिव्यांग गरीब कार्यकर्ता युद्धात प्रसिद्धीपासून अलिप्त असूनही कर्णासारखे बाण सोडत होता. गाव पातळीवरील कार्यकर्ता पेटलेला होता.




दुसरीकडे पार्थ पवार व जय पवार हे दोघे खमकेपणाने दादांच्या प्रचार यंत्रणेवर लक्ष ठेवून होते. जय पवारांनी बारामती अक्षरशः पिंजून काढली होती. राष्ट्रवादीचा कार्यकर्ता गुलाबी झेंड्याचा पाईक नव्हता तर स्वराज्याचा भगवा पेलण्याचे सामर्थ्य मनगटात असणाऱ्या अजित दादांचा प्रचारक होता. लाडक्या बहिणींच्या लाडक्या दादांनी राज्याचे नेतृत्व करावे ही भावना हिंदूंसह मुस्लीम भगिनींचीपण होती. त्याच जोरावर दादांनी हा विजयाचा ध्वज फडकवला.

आता विधानसभा निवडणूक हा इतिहास ठरला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल फेब्रुवारीत वाजेल. आता राष्ट्रवादी पक्षाच्या खऱ्या कसोटीचा, पक्ष संघटन बांधणीचा काळ सुरू झाला आहे. पक्षश्रेष्ठींकडून संघटनात्मक जाळे मजबूत करायला सुरुवात होणार आहेच. मात्र त्यासाठी पैशाने विकत आणलेली एजन्सी कामी येणार नाही तर घरच्या भाकरीवर काम करणारा, वाहून घेणारा प्रचार हाच पक्षाचा कणा असणार आहे.

पक्षात प्रवेश व्हावा, जबाबदारी मिळावी, पक्ष वाढावा, थोडे शासकीय पाठबळ मिळावे सोप्या भाषेत हा पक्ष सर्वसामान्यांचा व्हावा ही प्रत्येकाची अपेक्षा आहे. वरिष्ठांनी आमच्या भावना समजून घ्याव्या ही माफक अपेक्षा असणे काही गैर नाही. नाहीतर पंढरी व पांडुरंगाचे महत्त्व वाढवावे संतांनी- वारकऱ्यांनी आणि विठ्ठलाला घेरावे भलत्यांनीच असे होता कामा नये. गुलाबी बडवे विठ्ठलाला सोडायलाच तयार नसतील तर सामान्य वारकरी तिथे पोहोचेल कसा? यशवंतराव चव्हाण ते सुधाकरराव नाईक, वसंतदादा पाटील ते पवारसाहेब अशा अनेक सुसंस्कृत राजकारण्यांना महाराष्ट्रने पाहिले आणि अनुभवले. आता या विचारांचा परिपाक अजित त्यांच्या रूपाने आला आहे, तो जपला जावा इतकीच काय ती अपेक्षा.

दादा स्वयंभू आहेत, त्यांना इतरांनी दिशा दाखवावी इतके ते नक्कीच छोटे नाहीत. राष्ट्रवादीचे यश हे दादांच्या नेतृत्वाचे, कर्तृत्वाचे आहे. यात असंख्य कार्यकर्त्यांचे काबाडकष्ट आणि दिवस-रात्रीची मेहनत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, अजितदादा आणि राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने अतिशय मेहनतीने मिळविलेला यशाच्या पीठावर कुणी बाहेरच्या माणसाने रेघोट्या ओढून भाकरी थापण्याचे करू नये हीच माफक अपेक्षा आम्हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांची आहे. अरोरांच्या नावात 'नरेश' असेलही; पण आमचं दैवत, राष्ट्रवादी परिवाराचे पालक, कुटुंबप्रमुख हे आमचे लोकनेते अजितदादा पवार आहेत आणि आमच्यासाठी 'नरेश' म्हणजेच 'राजा' ही महाराष्ट्राची सर्वसामान्य जनता आहे. त्यामुळे आमच्या यशाच्या 'रांगोळी'त कुणी स्वतःचे प्रोफेशनल 'डिझाइन' मिसळण्याचा प्रयत्न करू नये, हे बरे. तसे करणाऱ्यांना, त्यांच्या नसलेल्या यशाचा 'बॉक्स' गुंडाळून लोक आणि कार्यकर्तेच घरी बसायला भाग पाडतील.

# शिक्षण हे परिवर्तानाचे हत्यार आहे : महात्मा फुले




एकविसाव्या शतकाकडे नजर लावून बसलेल्या भारतात शिक्षण तळागाळापर्यंत पोहचू शकलेलं नाही हे वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही समाजात हक्कांची जाण आहे. पण कर्तव्याचा विसरच पडला आहे. आजही दीनदुबळे दलित अन्याय सोसतच आहेत. परहिता साठी अष्टाप्रहर राबणारा, झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी आजही दारिद्र्याचे आणि अन्यायाचे चटके अनुभवतच वाटचाल करत आहे. शहरे सोडली तर आजही खेडोपाडी, डोंगरी भागात छोटी छोटी मुलं कामाला जुपली जात असल्यानं शिक्षणाला वंचितच आहेत. शांतता वर्षातही शांतता औषधालाही नाही. उलट जिकडे तिकडे द्वेषाचे, विद्रोहाचे अशांत वातावरण खदखदत आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढली आणि ज्ञानांच दालन त्यांच्यासाठी खुले केले हे जरी खरे असले तरी विषमता आणि जातीभेद यांना आज देखील पूर्णपणे मुठमाती मिळू शकलेली नाही, ही वास्तविकता आहे.

शिक्षणाचा प्रसार जर तळागाळापर्यंत झाला तरच क्रांती होईल असं तर ''विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शुद्र खचले''. शंभर वर्षापूर्वीची हिच स्थिती आजही आहे. माणसाच्या समुद्रात आज माणुसकीच हरवली आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमता याचं आजही पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. बंधुभाव फक्त ओठातच आहे.अशी स्थिती पाहिल्यावर महात्मा फुल्यांसारखी माणसं का बरं अस्वस्थ होणार नाहीत. आज जर महात्मा फुले आपल्यात असते तर त्यांनी आपल्या परखड विचारांच्या पवित्र्यांनी द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, दरिद्र्य यांचा अंधःकार दूर करायचा नक्कीच प्रयत्न केला असता. आणि मग या विषयावर बोलायचा कदाचित प्रसंगही आला नसता.

हिंदू समाजातल्या मतलबी रुढींचा त्यांना तिरस्कार वाटू लागला. ज्योतिबांने शाळेतला अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच १८४७ पर्यंत ज्योतिबा बुध्दिने चांगले प्रौढ झाले होते. त्यांनी समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, आपला हिंदु समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत राहिल्याने प्रतिगामी बनला आहे. स्त्रियां आणि शुद्रांची कुचंबना होत आहे. हे सर्व स्त्रियां आणि बहुजन समाज शिक्षणापासुन दुर राहिल्यामुळे घडत आहे, असे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यावरुन त्यांनी भावी जीवनातील कार्याची दिशा ठरविली. ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता समाजकार्य करायचे ठरवून कामाला लागले. सामाजिक गुलामगीरी दूर करणे आणि सर्वांना शिक्षणाची दारे खुली करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरले.

हे कार्य तत्कालीन रुढीप्रिय समाजाला रुचले नाही. मुलींची शाळा काढण्यासाठी पूर्व तयारी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी ही आपल्या पतीच्या जीवन कार्याला मनापासून सहाय्य केले. १८४८ मध्ये पहिली १८५१ मध्ये दुसरी आणि १८५२ मध्ये तिसरी मुलींची शाळा काढली. या शाळा व्यवस्थित चालू लागल्या. मेजर कँडी यांनी सरकारतर्फे ७५ रुपये अनुदान मंजुर केले. फुले यांच्या या महान सामाजिक कार्याचा गौरव म्हणुन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या नंतर ज्योतिबांनी सामाजिक सुधारणेकडे विशेष लक्ष द्यायचे ठरविले. व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि बुध्दि प्रामाण्य यासाठी ते झगडू लागले. सतीची प्रथा, विधवा पूर्नविवाह, भृणहत्या (लहान मुलांची हत्या) या समाज विघातक गोष्टींना त्यांनी विरोध केला. केवळ शाब्दिक विरोध न करता त्यांनी पुढाकार घेवून ''बालहत्या प्रतिबंधगृह'' ही संस्था सुरु केली. समाजस्पृश्य-अस्पृश्य असा भेदाभेद पाळणाऱ्याचा रोष पत्करुन त्यांनी आपल्या घरी असलेला पाण्याच्या हौद सर्वांना म्हणजे अस्पृश्यांनाही खुला केला.

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे लक्षात येताच अस्पृश्यासाठी, स्त्रियांसाठी त्यांनी शाळा उघडल्या, अनाथाश्रम काढले, वृत्तपत्र काढले. धर्म जन्माने न मिळता माणसाच्या स्वतःच्या बुध्दीने स्विकारला पाहिजे. शेतकयांच्या व्यथा इंग्रज प्रशासनाच्या कानी पोहोचविल्या.शेतकरी हा समाजाचा कणा आहे. पोशिंदा अन्नदाता आहे, असे मत मांडले आणि जगजागृती केली. त्यांच्या साठाव्या वर्षी जनतेने मुंबईस त्यांचा नेत्रदिपक सत्कार करुन त्यांना ''महात्मा'' ही पदवी बहाल केली. सामाजिक समता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी ज्योतिबाने अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड मिळाली जणू ती मानवतेच्या कणवतेची बैठक होती. ज्योतिबांच्या कृतीमुळे, कर्तृत्वामुळे या समाजाची नवी पहाट उदयास आली. सावित्रीमाई भारतातील आद्यकांतीकारी थोर स्त्री होती. ज्योतिबांना सावित्रीमाईची सक्रीय साथ लाभली. सामाजिक सुधारणेची सुरुवात आपल्या घरापासुन करणारे ज्योतिबाफुलें सारखे समाजसुधारक युगात होणे अशक्य आहे. सुधारकाग्रणी, संपूर्ण महाराष्टाचे भुषण, सुधारकांचे सुधारक त्यांच्या विचारांनी आणि धाडसी वृत्तीने कृत्तीने समाजाला जागे केले. काळाच्या खूप पुढे जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. हीन-दीन-जीवांना एकोणिसाव्या शतकात त्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.



मानवी सामाजिक सुधारणेचे अवलोकन केले, परिस्थितीचे अवलोकन केले आणि प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याच्या दिव्य युगाकडे सामाजिक माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातील पहिला समाजक्रांतीकारक क्रांतिबा ज्योतिराव फुले नावाचा धगधगता लाव्हा तयार झाला. कारण देशात जातीभेदाची सुनामी ऊफाळुन आली होती. त्यामुळे कोणी शुद्र नदीकाठावर वस्त्रधुत असता तेथे एखादा भट आला तर शुद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करुन भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही, अशास्थळीजाऊन वस्त्रे धुवावी लागत. भटाच्या अंगावर नकळत पाण्याचा शिंतोडा उडालाच तर भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन आपल्या जवळचे जड भांडे शुद्रांच्या डोक्यावर मारावे, ब्राम्हणावर तर सावली सुध्दा पडू नये याची पूर्णपणे खबरदारी शुद्राने वस्तीतून वाट असेल त्या वाटेवरुन जाण्यास सुध्दा धोका पत्करु नये असा कायदा, अशा कायद्याचे राज्य होते, त्यामुळे राज्यात अनेक छळवाद होते. स्त्रियांना तर त्या रुढीने बंदीस्तच करुन ठेवले होते. पुरुषप्रधान व्यवस्थांच्या रणधुमाळी विषयी फुले म्हणतात की, स्त्री ही जात अबला असल्यामुळे तिच्यापूढे लोभी व धाडसी पुरुषांनी स्वतःचेच म्हणणे खरे केले आणि स्त्रीयांना मानवी हक्क समजू नयेत म्हणून पूर्ण अंधारात ठेवले. ज्योतिरावांना सावित्रीमाईंची भक्कम साथ मिळाल्यानंतर त्यांनी विचार केला की, हे आता शुद्र अतिशुद्रांचा छळवाद बदलला पाहिजे. त्यावेळे पासून स्त्री चळवळीचा जन्म झाला.

महात्मा फुले आज जरी आमच्यात नाहीत परंतु कर्तृत्वाच्या रुपाने ते निश्चितच आमच्यांत आहेत. कारण जे दुस-यांसाठी मरतात, तेच खया अर्थानं जगतात आणि आपल्या कार्यकर्तृत्वाच्या रुपानं अमर असतात, म्हणजेच आपल्यातच असतात. आता हे जर खंर असेल तर महात्मा फुले देखील कार्यरुपानं आपल्यातच आहेत, असं नाही का तुम्हाला वाटत? मला तर वाटतं, या विषयाच्या निमित्तानं ज्ञानज्योतीचं चरित्र आणि चारित्र्याचा आचार, विचार आणि उच्चाराचा जवळून परिचय व्हावा आणि आपण त्यांचे कार्य जोमानं, जिद्दीनं आणि निष्ठेनं करावं असंच बहुधा बहुतेकांना अपेक्षित असावं लौकिकर्थानं आज जरी महात्मा फुले आपल्यात नसले, तरी त्यांचे अलौकिक कार्य कलेकलेनं वाढतच राहणार आहे.आणि त्यांचे अस्तित्व तर नेहमीचे आपल्यात राहणार आहे.

ज्ञानज्योत प्रज्वलित केलेल्या ज्योतिबांना सामाजिक समता, मानवता, विवेक, विनय आणि नम्रता यावर प्रकाश टाकुन राष्ट्राला स्वायत्ततेच ध्येय गाठण्यासाठी गतिमान बनवायचं होतं. समाजजागरणाचा वसा घेतलेले स्त्रीशिक्षण आणि स्त्रीशक्ति जागृतीचा मंत्र निनादात ठेवणारे, आणि अस्पृश्यांबद्दल कणव आणि बंधुता बाळगणारे ज्योतिबा आज असते तर ! खरंच काय बरं वाटलं असतं त्यांना ? आजही समाजात समता आणि बंधुता पूर्णपणे उतरु शकली नाही हे पाहून ते नक्कीच अस्वस्थ झाले असते. जयंती आणि पुण्यतिथी या दोन दिवशी आपली आठवण ठेवणारे, याच दिवशी आपल्या पुतळ्याला हार घालून खोटी पूजा करुन अवडंबर माजवणारे तथाकथित कार्यकर्ते आणि पुढारी पाहून त्यांना नक्कीच चीड आली असती.

६३ वर्षे चंदनासारखे झिजले. प्रवास केला, व्याख्याने दिली, लेख लिहिले. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद या आधुनिक मुल्यांवर भर देऊन सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली. डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. सहज सोप्या भाषेत नेमकी स्पष्टता आणणे त्यांना जमत असे. विचारांना कृतिशीलतेची जोड दिली. जैसे बोलावे, तैसे चालावे, मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे या समर्थवचनाची सार्थकता सिध्द करणारा हा महात्मा सर्व सुखाचे आगर नीतितत्त्वांचे माहेर अशा हया महात्म्याचे अविरत कष्टाने २८ नोव्हेंबर १८९० मध्ये अनंतात विलीन झाले, त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

*************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# थंडीच्या दिवसांमध्ये त्वचेची काळजी घेण्यासाठी नियमित लावा ‘या’ गोष्टी, त्वचेवरील भेगा होतील कमी

राज्यभरात सगळीकडे थंडी वाढू लागली आहे. थंडी वाढल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या वाढू लागतात. या दिवसांमध्ये वातावरणात गारवा असल्यामुळे आरोग्यासह त्वचेसंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. त्वचा कोरडी पडणे, त्वचेला भेगा पडणे, खाज येणे, त्वचेवर पांढरे डाग दिसणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. अशावेळी अनेक महिला बाजारात उपलब्ध असलेल्या क्रीम्स, लोशन, मॉइश्चरायझर, घरगुती उपाय इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. सतत चेहऱ्यावर कोणते ना कोणते प्रॉडक्ट लावल्यामुळे त्वचा खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे सतत त्वचेवर कोणत्याही गोष्टी लावू नये. असे केल्यामुळे त्वचेची गुणवत्ता खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला कोरड्या त्वचेच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी कोणते घरगुती पदार्थ लावावे, याबद्दल सांगणार आहोत. यामुळे तुमची त्वचा चमकदार आणि मऊ दिसेल.



रात्री झोपण्याआधी कोरड्या त्वचेवर लावा ‘हे’ पदार्थ:

ग्रीन टी टोनर:

ग्रीन टी त्वचेच्या आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहे. ग्रीन टी त्वचेला लावल्यामुळे त्वचेसंबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळतो. टोनरचा वापर त्वचेवर केल्यामुळे त्वचेतील घाण स्वच्छ होते आणि ओपन पोर्स कमी होतात. त्वचेची काळजी घेण्यासाठी बाजरात मिळणारे महागडे टोनर वापरण्याऐवजी घरी बनवलेल्या टोनरचा वापर करावा. यासाठी गरम पाण्यात ग्रीन टी मिक्स करून व्यवस्थित उकळवून घ्या. त्यानंतर थंड झाल्यानंतर स्प्रे बॉटलमध्ये भरून रात्री झोपण्याआधी नियमित त्वचेवर लावून ठेवा.

खोबरेल तेल:

त्वचेसंबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी खोबरेल तेलाचा वापर करावा. खोबरेल तेलात असलेले गुणधर्म आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहेत. शिवाय या तेलामध्ये चांगले फॅट्स आढळून येतात. खोबरेल तेल त्वचेवर लावल्यामुळे त्वचा कोरडी आणि रुक्ष होत नाही. त्यामुळे रात्री झोपण्याआधी एक थेंब खोबरेल तेल घेऊन संपूर्ण त्वचेवर लावावे. यामुळे त्वचा कोरडी पडत नाही.

बदामाचे तेल:

औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेले बदाम तेल आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. बदाम तेलाचा वापर त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी केला जातो. शिवाय या तेलात विटामिन ई, फॅटी ॲसिड, प्रोटीन, झिंक इत्यादी अनेक घटक आढळून येतात. बदाम तेल त्वचेमध्ये लगेच मुरते. त्यामुळे रात्री झोपण्याआधी त्वचेवर बदाम तेल लावावे.

कोरफड जेल:

त्वचेसंबंधित सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी कोरफड जेलचा वापर केला जातो. कोरफड जेल त्वचेमध्ये लगेच मुरते. शिवाय यामध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे त्वचेमधील ओलावा कायम टिकून राहतो. कोरफड जेल तुम्ही मॉइश्चरायजर म्हणून वापरू शकता. यामुळे हिवाळ्यासह सर्वच ऋतूंमधले त्वचा ताणली जात नाही.

# नसांमध्ये जमा झालेले खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यासाठी चपातीच्या पिठात मिक्स करा ‘हे’ बारीक दाणे

चुकीच्या जीवनशैलीचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. यामुळे अनेक वेगवेगळे आजार होण्याची शक्यता असते. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये होणारे बदल, सतत बाहेरच्या पदार्थांचे सेवन, धूम्रपान करणे, अपुरी झोप, तणाव इत्यादी गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो.यामुळे प्रामुख्याने उद्भवणारी समस्या म्हणजे लठ्ठपणा, वाढलेले वजन. वजन वाढल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. वाढलेल्या वजनामुळे इतर आजार होण्याची शक्यता असते. त्यामुळे वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. शरीरामध्ये कोलेस्ट्रॉलची वाढ होणे, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. शरीरात खराब कोलेस्ट्रॉलची वाढ झाल्यानंतर ते कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी रोजच्या आहारात भात खाण्याऐवजी चपाती खाण्याचा सल्ला दिला जातो. कारण भात खाल्यामुळे पोट लगेच भरते आणि अधिककाळ भूक लागत नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला वाढलेले वजन कमी करण्यासाठी चपातीच्या पिठात कोणते पदार्थ मिक्स करावे, याबद्दल सांगणार आहोत. यामुळे तुमचे वाढलेले वजन झपाट्याने कमी होईल आणि इतर आजारांपासून शरीराचा बचाव होईल.

चपातीच्या पिठात मिक्स करा या पौष्टिक बिया:

अळशीच्या बियांचे फायदे:

अळशीच्या बिया आरोग्यसाठी अतिशय पौष्टिक आहेत. या बियांचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. उच्च कोलेस्ट्रॉलची समस्येने त्रस्त असलेल्या लोकांनी आहारात अळशीच्या बियांचे सेवन करावे. अळशीच्या बियांची बारीक पावडर करून गहू किंवा मैद्याच्या पिठात मिक्स करून चपाती तयार करा. या चपातीचे नियमित सेवन केल्यास आरोग्यसंबंधित अनेक समस्यांपासून सुटका मिळेल.

तुळशीची पाने:

आयुर्वेदिक गुणधर्मांनी समृद्ध असलेली तुळशीची पाने आरोग्यसाठी अतिशय प्रभावी आहेत. तुळशीच्या पानांमध्ये आढळून येणारे अँटिऑक्सिडंट्स आणि अँटी–इंफ्लेमेटरी गुणधर्म रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. शिवाय यामुळे मधुमेह नियंत्रणात राहतो. चपातीच्या पिठामध्ये तुळशीची पाने बारीक करून टाकल्यास रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होईल.

गव्हाचं पीठ:

चपाती बनवण्यासाठी पांढर पीठ वापरण्याऐवजी गव्हाचं पीठ वापरावे. गव्हाच्या पिठातील गुणधर्मांमुळे वाढलेले वजन नियंत्रणात राहते आणि वाढलेले वजन कमी होण्यास मदत होते. गव्हाच्या पिठाच्या चपात्या खाल्यामुळे बिघडलेली पचनक्रिया सुरळीत राहण्यास मदत होते. त्यामुळे रोजच्या आहारात चपातीचे सेवन करावे.

# सर्दी खोकला झाल्यानंतर ‘या’ पद्धतीने घरीच तयार करा आयुर्वेदिक चहा, घरगुती उपाय आरोग्यासाठी ठरतील प्रभावी

वातावरणातील बदलांचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये सातत्याने होणारे बदल, अपुरी झोप, सतत बाहेरच्या पदार्थांचे सेवन इत्यादी गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्य लगेच बिघडून जाते. नाक, घसा खवखवणे आणि खोकला इत्यादी समस्या उद्भवू लागतात. शिवाय ताप किंवा सर्दी झाल्यानंतर अंगदुखी, नाकातून सतत पाणी येणे, घसा खवखवणे, नाक चोंदणे इत्यादी अनेक समस्या उद्भवल्यानंतर आरोग्य बिघडून जाते. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्याची काळजी घ्यावी. मुंबईसह इतर सर्वच ठिकाणी हवामानात सतत बदल होत असतात. या बदलांचा परिणाम आरोग्यावर होण्याची शक्यता असते. सर्दी किंवा खोकला झाल्यानंतर अनेक लोक डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार घेतात. मात्र त्याचा फारसा फायदा शरीरावर होत नाही. वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे सतत आरोग्य बिघडून जाते. सर्दी किंवा खोकला झाल्यानंतर गोळ्या औषध घेण्यापेक्षा स्वयंपाक घरातील पदार्थांचा वापर करून चाटण तयार करावे. यामुळे सर्दी खोकला कमी होऊन आराम मिळेल. आज आम्ही तुम्हाला सर्दी खोकल्यापासून आराम मिळवण्यासाठी कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.





वाफ घ्यावी:

सर्दी किंवा खोकला झाल्यानंतर सगळ्यात आधी गरम पाण्याची वाफ घ्यावी. वाफ घेतल्यामुळे सर्दी कमी होते. वाफ घेतल्यामुळे तुम्हाला लगेच आराम मिळेल. वाफ घेताना गरम पाण्यात झाडाचे तेल, निलगिरीचे तेल, लेमनग्रास तेल, लवंग तेल इत्यादी गोष्टी टाकून तुम्ही वाफ घेऊ शकता. किंवा साध्या गरम पाण्याची वाफ घेतली तरीसुद्धा सर्दीपासून आराम मिळेल.

आल्याचा चहा:

आल्यामधले असलेले दाहक विरोधी गुणधर्म आरोग्य सुधारण्यासाठी मदत करतात. आल्याच्या चहाचे किंवा आल्याच्या रसाचे सेवन केल्यास सर्दी खोकल्यापासून आराम मिळेल आणि शरीर निरोगी राहील. आल्याच्या रसाच्या सेवनामुळे सर्दी खोकल्यापासून लगेच आराम मिळतो. आल्याचा चहा बनवण्यासाठी गरम पाण्यात आलं टाकून व्यवस्थित उकळवून घ्या. त्यानंतर पाण्यात मध टाकून प्या. यामुळे सर्दी खोकला कमी होईल.

तुळशी आल्याचा चहा:

तुळशीमध्ये असलेले गुणधर्म आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहेत. शिवाय सकाळी नियमित १ तुळशीचे पान खाल्यास कोणत्याही आजाराची लागण होणार नाही. सर्दी खोकला झाल्यानंतर डॉक्टरांकडे जाण्याऐवजी घरगुती उपाय करूनही आराम मिळवता येतो. गरम पाण्यात तुळशी आणि आलं टाकून चहा तयार करावा. या चहाच्या सेवनामुळे सर्दी खोकला लगेच बरा होईल.

# हिवाळ्यात शरीराला ऊर्जा देण्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये बनवा लिंबू-ब्रोकोली सूप, पदार्थ होईल झटपट

राज्यभरात सगळीकडे हिवाळा ऋतूला सुरुवात झाली आहे. हिवाळ्याच्या दिवसांमध्ये वातावरणात गारवा असतो. सगळीकडे धुक्यांची चादर पसरलेली असते. पण हिवाळा ऋतू सुरु झाल्यानंतर आरोग्याची जास्त काळजी घेणे गरजेचे आहे. कारण या दिवसांमध्ये सर्दी, खोकला आणि साथीच्या आजारांसह इतर आजार सगळीकडे पसरू लागतात. या आजारांपासून शरीराचा बचाव करण्यासाठी आहारात पौष्टिक आणि हेल्दी पदार्थांचे सेवन करावे. वातावरणात गारवा निर्माण झाल्यानंतर थंड पदार्थांचे सेवन करण्याऐवजी मसालेदार आणि गरमागरम पदार्थांचे सेवन करावे. हे पदार्थ खाल्यामुळे शरीरात उबदार पणा येतो. ज्यामुळे आरोग्य सुधारते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला हिवाळ्याच्या दिवसांमध्ये सकाळच्या नाश्त्यात लिंबू आणि ब्रोकोली सूप कसे तयार करावे, याची सोपी रेसिपी सांगणार आहोत हा पदार्थ बनवण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. कमीत कमी साहित्यामध्ये सूप तयार होते. चला तर जाणून घेऊया लिंबू आणि ब्रोकोली सूप बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य:

ब्रोकोली  
लिंबाचा रस  
पाणी  
काळीमिरी पावडर  
ऑलिव्ह ऑइल  
मीठ  
आलं लसूण

कृती:

लिंबू ब्रोकोली सूप बनवण्यासाठी सर्वप्रथम, ब्रोकोली स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर तिचे बारीक तुकडे करा.

कढई गरम करण्यासाठी ठेवून त्यात तेल गरम करून बारीक चिरून घेतलेलं आलं लसूण टाकून भाजून घ्या.

नंतर त्यात बारीक चिरून घेतलेली ब्रोकोली टाकून शिजण्यासाठी ठेवा. ब्रोकोलीमध्ये थोडंसं पाणी टाकावे.

गॅस बंद करून ब्रोकोली थंड झाल्यानंतर मिक्सरच्या भांड्यात टाकून पातळ पेस्ट तयार करा.

त्याच पॅनमध्ये तयार केलेली पेस्ट, लिंबाचा रस, मीठ आणि काळीमिरी, आवश्यकतेनुसार पाणी टाकून उकळी येण्यासाठी ठेवा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले लिंबू ब्रोकोली सूप.

# ...ची कमतरता ठरेल घातक, शरीर पडेल ठप्प ५ संकेत

व्हिटॅमिन बी १२ शरीराच्या प्रत्येक अवयवासाठी खूप महत्वाचे आहे. कारण त्याच्या मदतीनेच डीएनए आणि लाल रक्तपेशी तयार होऊ शकतात. मेंदू आणि मणक्याच्या हाडाच्या विकासातही ते महत्त्वाची भूमिका बजावते. एवढेच नाही तर केस, नखे आणि त्वचा चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी हे जीवनसत्वही जबाबदार आहे. विटामिन बी१२ ची कतमरता ही शरीरासाठी अत्यंत घातक आणि धोकादायक ठरू शकते.

अशा परिस्थितीत व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेमुळे शरीरात अनेक गंभीर लक्षणे दिसू लागतात. हे जीवनसत्व पाण्यात विरघळणारे आहे आणि ते प्रामुख्याने मांस, मासे, अंडी या दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळते. अशा परिस्थितीत, शाकाहारी लोकांमध्ये व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता अधिक सामान्य आहे. यासाठी लवकरात लवकर उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा हळूहळू शरीरातील महत्त्वाची कार्ये ठप्प होऊ लागतात. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे मज्जासंस्थेमध्ये समस्या निर्माण होतात, ज्यामुळे हात आणि पाय मुंग्या येणे, अशक्तपणा, चालण्यात अडचण, गोंधळ आणि न्यूरोपॅथी होते. या व्हिटॅमिनच्या दीर्घकाळापर्यंत कमतरतेमुळे चेतापेशींना कायमचे नुकसान होऊ शकते आणि त्यामुळे शरीरावरही परिणाम होऊ शकतो






लाल रक्तपेशींची निर्मिती

लाल रक्तपेशींच्या निर्मितीमध्ये व्हिटॅमिन बी१२ महत्त्वाची भूमिका बजावते. याशिवाय, शरीरातील लाल रक्तपेशींचे (ठइउ) उत्पादन कमी होऊ शकते, ज्यामुळे अशक्तपणा होतो. या स्थितीत व्यक्तीला अत्यंत थकवा, अशक्तपणा आणि श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे मेगालोब्लास्टिक निमिया देखील होऊ शकतो, जेथे रक्त पेशी सामान्य आणि असामान्य पेक्षा मोठ्या होतात.

मानसिक आरोग्य

व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेचा मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. त्याची कमतरता उदासीनता, चिंता आणि मानसिक समस्या वाढवू शकते. यामुळे मेंदूतील सर्फॅक्टंट्स कमी होतात, जे स्मृती, लक्ष आणि संज्ञानात्मक कार्यांसाठी आवश्यक असतात. व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दीर्घकाळ राहिल्यास मानसिक कार्यक्षमतेवर कायमस्वरूपी परिणाम होऊ शकतो.

उर्जेची पातळी

शरीरात ऊर्जा निर्मितीसाठी व्हिटॅमिन बी१२ आवश्यक आहे. हे अन्नातून ऊर्जा काढण्यास आणि शरीरातील उपयुक्त स्वरूपात रूपांतरित करण्यास मदत करते. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे थकवा, अशक्तपणा आणि उर्जेची कमतरता येते. यामुळे अशक्तपणा आणि मानसिक थकवा येऊ शकतो, ज्यामुळे व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर आणि जीवनाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होतो.

पचनसंस्थेवर वाईट परिणाम

व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेमुळे पचनसंस्थेवरही वाईट परिणाम होतो. यामुळे पोटात जळजळ, मळमळ, बद्धकोष्ठता आणि गॅसचा त्रास होऊ शकतो. व्हिटॅमिन बी १२ च्या दीर्घकालीन कमतरतेमुळे पचनसंस्थेत अडथळा निर्माण होऊ शकतो, ज्यामुळे शरीर पोषक तत्वे योग्य प्रकारे शोषू शकत नाही.

# संध्याकाळच्या नाश्त्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये बनवा चविष्ट मूग मटकी भेळ, वाचा सोपी रेसिपी

संध्याकाळच्या वेळी कामावरून थकून आल्यानंतर भूक लागते. अशावेळी नाश्त्यामध्ये नेमकं काय खावं? हे सुचत नाही. पोहे, शिरा, उपमा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा होते. अनेक घरांमध्ये संध्याकाळच्या नाश्त्यात बाहेरून विकत आणलेली चटपटीत पदार्थ खाल्ले जातात. समोसा, ढोकळा किंवा शेवपुरी इत्यादी पदार्थ आणले जातात. पण सतत बाहेरच्या पदार्थांचे सेवन केल्यामुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. अपचन, गॅस, ॲसिडिटी वाढल्यानंतर आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. त्यामुळे नाश्त्यामध्ये शक्यतो घरी बनवलेल्या पौष्टिक आणि हेल्दी पदार्थांचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला संध्याकाळच्या नाश्त्यात भूक लागल्यानंतर सोप्या पद्धतीमध्ये मूग मटकीची भेळ कशी बनवावी, याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. भेळ बनवण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. शिवाय कमीत कमी साहित्यामध्ये पौष्टिक भेळ तयार होते. चला तर जाणून घेऊया रेसिपी.



साहित्य:

मूग  
मटकी  
कांदा  
टोमॅटो  
चाट मसाला  
शेव  
शेंगदाणे  
चिप्स  
मिरच्या  
कोथिंबीर  
मीठ

नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

# २६/११ च्या शुर विरांना सामूहिक अभिवादन..!

अहमदपूर :- सीमेवर व देशात कायदा, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी मिल्ट्री,पोलिस व संरक्षण दल जिवाची पर्वा न करता आपले कर्तव्य पार पाडतात त्याच मुळे आपण अगदी सुखाने जीवन जगतो.जनतेच्या जिवाचे रक्षण करताना प्रसंगी आपल्या प्राणाची आहुती देणा-या सैनिकांविषयी समाजाने कृतज्ञता व्यक्त करावी असे आवाहन जेष्ठ नेते गणेश दादा हाके पाटिल यांनी केले. २६/११ रोजी मूंबई वर झालेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या विर जवानांना सम्राट मित्र मंडळाच्या वतीने आयोजीत केलेल्या आदरांजली कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या प्रसंगी माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई काबळे,रहिमखान पठाण, जुगलकिशोर शर्मा,युवा नेते लक्ष्मणराव अलगूले, सहायक पोलीस निरीक्षक, डॉ.मधुसूदन चेरेकर,पत्रकार त्रिशरण मोहगावकर,भीमराव कांबळे,गणेश मुंडे,मेघराज गायकवाड,दलित मित्र डॉ.घोटकेकर,शेख नाजीम, सय्यद तबरेज,शेख जाबेरभाई, शेख मतीनभाई, गौतमभाऊ, संगमेश्वर बनसोडे, सिद्धार्थ वाघमारे,सतीश कदम,राहूल तलवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुरूवातीला शहीद जवानांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती पेटवून सामूहिक भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या वेळी सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष युवक नेते डॉ. सिध्दार्थकूमार



सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रप्रेम वृध्दीगत करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमाची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. या वेळी मेजर डॉ.मधुसूदन चेरेकर,रहिमखान पठाण यांची समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शेख मतीन यांनी केले तर आभार सचिन बानाटे यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वैविध्यपूर्ण दिवाळी अंकांची परंपरा केवळ मराठी भाषेतच संविधान गौरव दिनी ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांचे प्रतिपादन

लातूर :- साहित्य,विज्ञान,आरोग्य,शेती,पर्यावरण,ज्योतिशास्त्र आदि विविध विषयांवरील ज्ञान दिवाळी अंकांच्या माध्यमातून देण्याची गेली ११५ वर्षांची परंपरा आजही कायम असून,ज्या दिवाळी अंक जगभर परसलेला मराठी वाचक त्यांचा आस्वाद घेत असतो,दिवाळी अंक काढण्याची ही अभिमानास्पद परंपरा केवळ मराठी भाषेतच आहे असे सांगून,सर्वांगसुंदर अशा भारतीय संविधानामुळेच आपण आज सुरक्षित राहून विकासाच्या वाटा धुंडाळतो आहोत,असे प्रतिपादन ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांनी येथे केले.



लातूरच्या हरिभाऊ नगरातील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात मंगळवार,दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान गौरव दिन आणि दिवाळी अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ग्रंथमित्र अडसुळे बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी साहित्यिक इंजि.हरिदास अडसुळे हे होते.

पुढे बोलताना ग्रंथमित्र अडसुळे पुढे म्हणाले की,ज्ञानाची परंपरा प्रगाढ आहे,ती टिकली पाहिजे,यासाठी सार्वजनिक ग्रंथालयातून काम केले जाते,बाराव्या शतकापासून संतांनी ज्ञानाची परंपरा टिकवली. भारतात २२ बोली भाषा आहेत,डॉ.गणेश देवी यांनी भाषेचे संशोधन करुन दहा हजार बोली भाषेची सूची केली.सुमारे सव्वाशे वर्षांपासून दिवाळी अंकांमधून सुरु असलेली ही ज्ञान गंगा अहोरात्र वाहती ठेवण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करीत आहेत.त्याचा उपयोग करुन घ्यावा.म.ज्योतिराव फुले,सयाजीराव गायकवाड,शाहू महाराज,बाबासाहेब आंबेडकर यांनीही वसतीगृहे,शाळा,ग्रंथालये सुरुवात करुन ज्ञानाचा प्रसार केला.अलिकडे ज्ञान बंदिस्त करण्याचे कारस्थान सुरु आहे,पण ज्ञानाची किंमत ओळखून आपण त्याचा उपयोग विकासासाठी करावा. संविधानाचे वाचन प्रत्येकाने केले पाहिजे हा देश सगळ्यांचा आहे,असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात इंजि.हरिदास अडसुळे यांनी संविधानाने सर्वांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिले आहे,तथापि आज संविधानाला मोडीत काढण्याचे प्रयत्न होत आहेत,अशावेळी सर्वांनी याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी केले.ग्रंथपाल अंजुषा काटे यांनी आभार मानले.प्रारंभी ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आले.नंतर मान्यवरांचे ग्रंथभेट देवून स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाला लिपिक संकेत होळीकर,वाचक गणपत वाव्हळे,विकी सोमवंशी,प्रल्हाद गायकवाड,कवी प्रदीप कांबळे,अर्थव कदम,आर.एन.खाडप,जे.एन.माने,किशन यमुलवाड, धनराज कांबळे, मारुती तलवारे,जी.एच.गायकवाड,पी.एन.बसपूरे,एस.एस.साबळे,आनंद अडसुळे आदींची उपस्थिती होती..

## अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठीचे सबळीकरण होईल - परशुराम पाटील

मुंबई: - मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याप्रकरणी 'अभिजात मराठी भाषा समिती'चे सदस्य आणि मराठी भाषा संचालनालयाचे माजी संचालक श्री. परशुराम पाटील यांचा विशेष सत्कार मुंबई येथील नरेवाडी विकास मंडळ आणि धनलक्ष्मी पतसंस्था यांच्या वतीने लोअर परेल मुंबई येथील बीडीडी चाळ मधील बुद्ध विहार हॉलमध्ये करण्यात आला. यावेळी बार कौन्सिलचे सदस्य सुभाष घाडगे, धनलक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष हरिश्चंद्र गोविळकर, उपाध्यक्ष लक्ष्मण पाटील यांसह शंकर पवार, बाळकृष्ण कदम, अधिवक्ता दीपक निलवे, संजय रणदिवे, विक्रम कोकितकर इत्यादी पदाधिकारी आणि कोल्हापूर जिल्ह्यातील मुंबई निवासी मराठी भाषाप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असतांना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्याविषयीचा प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठवण्यासाठी मराठी भाषातज्ज्ञांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या काही बैठकींना उपस्थित राहून श्री. परशुराम पाटील यांनी मार्गदर्शन केले होते. सत्काराला उत्तर देताना परशुराम पाटील, माजी संचालक, मराठी भाषा संचालनालय यांनी आपले मनोगत




व्यक्त केले की, अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठीचे सबळीकरण होईल. मराठीतील प्राचीन वाङ्मयाचा अन्य भाषेत अनुवाद होईल. मराठी भाषेत संशोधन करणाऱ्यांना 'स्कॉलरशिप' दिली जाईल. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांचा अभ्यास आणि संशोधन होईल. महाराष्ट्रातील १२ सहस्र ग्रंथालयांचे सशक्तीकरण करण्यासाठी अनुदान दिले जाईल. भारतातील ४५० विद्यापिठांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन केले जाईल. व्यवसाय मिळवून देणारी 'अर्थार्जनाची भाषा' आणि उच्च शिक्षण देणारी 'ज्ञानभाषा' असा मराठीचा विकास होऊ शकेल.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात भारतीय संविधान दिन उद्देशिकेचे वाचन करून संपन्न



केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड. येथे २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११-०० वाजता भारतीय संविधान।। उद्देशिकेचे सामुहिक वाचन।। ग्रंथालयाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते व व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या अध्यक्षते खाली मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी सवप्रथम भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले. संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन कार्यक्रमात माजी सरपंच रामराजे गायकवाड, रमेशआबा गायकवाड, कमलाकर साबळे, रावसाहेब जाधव, रविंद्र गायकवाड, रंजीत पाटील, हरिओम गायकवाड, ह.भ.प. नारायण भाऊ गायकवाड, नारायण भोगजकर, बबन पुंड, श्रुती पुंड, ज्ञानेश्वरी पुंड, शौर्य गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, कृष्णा गिरी यांचासह ग्रंथालयाचे उपाध्यक्ष मुरलीधर शिंदे, सचिव छायाताई सोमवंशी, सहसचिव ज्ञानोबा भोगनकर, सदस्या सुमनताई गायकवाड, ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी सामुहिक भारतीय संविधान।। उदेरीकेचे सामुहिक वाचन केले. त्यानंतर २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वहाण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

## केज येथे संविधान गौरव व शहीद पोलिसांना अभिवादन



केज/प्रतिनिधी केज येथील पोलीस बॉईज संघटना, रोटरी क्लब ऑफ केज व सर्वज्ञ अकॅडमी यांच्या वतीने केज शहरात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पोलीस स्टेशन अशी भव्य कँडल मार्च काढून संविधान गौरव व मुंबई हल्ल्यात अतिरेक्यांशी लढताना शहीद झालेल्या पोलिस जवानांना अभिवादन करण्यात आले. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, पत्रकार गौतम बचूटे यांनी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचे महत्व सांगितले. त्यानंतर छत्रपती शिवाजी चौकातून हातात कँडल व तिरंगा ध्वज घेऊन पोलिस स्टेशन पर्यंत रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन असरार कुरेशी, बापूराव सिंगण, महेश जाजू, पीएसआय राजेश पाटील, सपोनि शिंदे, सतीश डांगे, इंगळे, विनोद गुंड, अनिल ठोंबरे, सर्वज्ञ अकॅडमीचे संचालक बांगर, अकडेमीचे व एमआयटी क्लासेसचे विद्यार्थी उपस्थित होते. समारोप स्थळी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, हनुमंत भोसले, रोटरीचे सचिव अनंत तरकसबंद महेश जाजू, पत्रकार गौतम बचुटे, सर्वज्ञ अकॅडमीचे बांगर यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# खरिपाच्या काढणीमुळे पेरणी लांबणीवर सर्वात जास्त पेरा हरभऱ्याचा!

## किनवट तालुक्यात रब्बीची पेरणी अवघी ५७.३१ टक्के!

किनवट/शेख शौकत :-यंदा सरासरीपेक्षाही जास्त पाऊस झाल्याने रब्बी हंगामातील पिके जोमाने येण्याच्या आशा वाढल्या आहेत. अजूनही काही भागात खरीप हंगामातील ज्वारी, मूग, उडीद, सोयाबीन आदी पिके काढल्यानंतरची जमीन रब्बी हंगामासाठी तयार करणे चालू असल्यामुळे, रब्बीची पेरणी थोडी लांबणीवर पडली असल्याचे चित्र आहे. तालुका कृषी कार्यालयाच्या साप्ताहिक अहवालानुसार आतापर्यंत ८ हजार ४८२ हेक्टर क्षेत्रावर हरभऱ्यासह ज्वारी, गहू, मका आदी पिकांची पेरणी झाली असून, त्याची टक्केवारी ५७.३१ आहे. ज्या भागातील पेरण्या थोड्या लवकर झाल्यात, ती पिके उगवणीच्या अवस्थेत आहेत. यंदा रब्बी हंगामातील पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र १४ हजार ८०० हेक्टर निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी ०८ हजार ४८२ हेक्टरवर रब्बीची पेरणी झालेली आहे. यात सर्वाधिक पेरणी कडधान्यातील हरभरा पिकाची झालेली असून, त्या खालोखाल अनुक्रमे गहू, मका व ज्वारी ही पिके आहेत. तालुक्यात बागायतीसाठीचे सिंचनक्षेत्र एकूण पेरणीयोग्य क्षेत्राच्या केवळ चार ते पाच टक्क्याच्या आसपास आहे. हरभरा हा चांगला पाऊस झाल्यास जमिनीतील ओलाव्यावरच उगवतो, शिवाय त्यास पाणीही कमी लागते. त्यामुळे दरवर्षी सोयाबीन काढल्यानंतर कोरडवाहू शेती करणारे शेतकरी हरभऱ्यालाच जास्त पसंती देतात. सप्टेंबरच्या एक तारखेला सर्व मंडळात अतिवृष्टी तर ०२ व ०३ तारखेला जलधारा मंडळात शेवटची अतिवृष्टी झाली. उर्वरित दिवसात केवळ ८ दिवस हलका स्वरूपाचा पाऊस तर १९ दिवस पाऊस पडलाच नाही. ऑक्टोबर तर पूर्ण कोरडा गेला आणि परतीचा पाऊसही फारसा बरसला नाही. त्यामुळे खरिपातील मूग, उडीद, ज्वारी व सोयाबीन काढल्यावर रान तयार करून हरभऱ्यासह इतर पिके पेरण्यासाठी ऑक्टोबरचा दुसरा पंधरवडा उजाडल्यामुळे रब्बीची पेरणी लांबली असून, ती संथगतीने चालू आहे. हरभरा पिकासाठी थंडी महत्त्वाची आहे. चांगला ओलावा व थंडी असेल तर हरभरा विक्रमी उत्पादन देतो. मात्र हवामानखात्याने पूर्वीच नोव्हेंबरमध्ये थंडी कमी डिसेंबरमध्ये जास्त राहण्याबाबत सूचित केले आहे. त्यामुळे अजूनतरी हरभरा व गव्हाच्या कोवळ्या पिकांची पाहिजे तशी जोमदार वाढ झाली नसल्याचे काही शेतकऱ्यांनी सांगितले. आतापर्यंत तालुक्यात रब्बीची पेरणी झालेल्या पिकांचा तपशील पुढीलप्रमाणे: हरभऱ्यासाठीचे सर्वसाधारण क्षेत्र ८ हजार १९३ हेक्टर आहे. त्यापैकी ५ हजार ५९० हेक्टरवर हरभऱ्याची पेरणी झाली असून, त्याची टक्केवारी ६८.२३ आहे. त्यापाठोपाठ गव्हाचे स.सा.क्षेत्र ३ हजार २०५ हेक्टर आहे. आतापर्यंत ०१ हजार ४४६ हेक्टरवर गव्हाची पेरणी झाली असून, त्याची टक्केवारी ४५.१२ आहे. मक्याचे स.सा. क्षेत्र १ हजार ३९१ हेक्टर असून, ५३२ हेक्टरवर पेरणी झालेली आहे. त्याची टक्केवारी ३८.२५ आहे. रब्बी ज्वारीचे स.सा. क्षेत्र एक हजार ८३२ हेक्टर आहे. आतापर्यंत ६०५ हेक्टरवर ज्वारी पेरली गेली असून, त्याची टक्केवारी ३३.०२ आहे. तसेच इतर तृणधान्यासाठी स.सा. क्षेत्र ७४ हेक्टर आहे. त्याची पेरणी २१ हेक्टरवर झालेली असून, त्याची टक्केवारी २८.३८ आहे. या रब्बी हंगामात अजून तरी करडई व तीळ पिकांची पेरणी झाली नसून, केळी केवळ ०२ हेक्टर, धने ९ हेक्टर, तर भाजीपाला २७७ हेक्टरवर घेण्यात आलेला आहे. शेवटचा पाऊस होऊन दोन महिने उलटल्यामुळे ओलावा बराच कमी झालेला आहे. त्यामुळे कोरडवाहू रब्बी पिके आता पेरल्या जाण्याची शक्यता कमीच आहे. सिंचनाची सोय असलेल्या ठिकाणी डिसेंबर अखेरपर्यंत जी काही पेरणी होईल त्यावरून रब्बीची पेरणी झालेले एकूण क्षेत्र तालुका कृषी कार्यालयाच्या रब्बीच्या अंतिम अहवालावरून समजेल.




## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने संविधान दिन साजरा.



लातूर :- भारतीय बौद्ध महासभा लातूर जिल्हा महिला शाखा व समता सैनिक लातूर बटालियनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर येथे ७५ वा संविधान दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी सर्वप्रथम भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्प, धूप व दीपा ने अभिवादन करून सामूहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले. तसेच जिल्हा हिशोब तपासणीस आयु. प्रेमनाथ कांबळे सर यांनी संविधान प्रास्ताविका वाचन केले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य संघटक आयु. डी.एस नरसिंगे व महाराष्ट्र पोलीस वेल्फर असोसिएशनचे सचिव सुफी सय्यद यांनी संविधान दिनाचे महत्त्व सांगितले तर आभार जिल्हाध्यक्ष शारदाताई हजारे यांनी मानले या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून राज्य संघटिका दैवशालाताई गायकवाड, जिल्हा कोषाध्यक्ष मायाताई कांबळे, जिल्हा कोषाध्यक्ष ज्ञानेश्वरी ताई बटवाड, जिल्हा उपाध्यक्ष मेजर जनरल राजाराम साबळे, डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे जिल्हा सचिव अभिमन्यू लामतुरे जिल्हा सचिव आनंद डोणेराव, तालुकाध्यक्ष सुनीताताई भालेराव, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे लातूर जिल्हा प्रभारी प्रा. सतीश कांबळे सर, संजय गायकवाड, अजय गायकवाड, यावेळी माता भिमाई सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी संघटना लातूर व शहरातील महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE